इतरांच्या सेवेत स्वतः ला समर्पित करा. तुमचा स्व तुम्हाला सापडेल

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार ४ मे २०२५ | अंक १४३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# भारताला सर्जनशील महासत्ता करणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

करमणूक क्षेत्र हे महाराष्ट्र आणि भारतासाठी विकासाचे नवे इंजिन आहे. भारताला सर्जनशील महासत्ता करणार असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई येथे काल (1 मे) 'वेव्हज 2025' ये आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते या समिटचे उद्धाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यपाल सीपी राधाकृष्णन, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय राज्यमंत्री एल. मुरुगन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार असे अनेक मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. "आजच्या डिजिटल युगात आशय (कंटेंट) हे सर्वात वेगाने पसरत आहे आणि महाराष्ट्र या सर्जनशील क्रांतीच्या केंद्रस्थानी आहे, ही परिषद ही केवळ एक घटना नसून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली चळवळ आहे. राज्य सरकार ॲनिमेशन, गेमिंग, म्युझिक आणि डिजिटल माध्यमांना चालना देण्यासाठी अनुकूल धोरणे राबवत आहे. मुंबईतील 500 एकरच्या फिल्मसिटीला नव्या पिढीच्या स्टुडिओ इकोसिस्टममध्ये रूपांतर करण्याचे काम सुरू आहे. यातील 120 एकरमध्ये माध्यम व करमणूक शहर उभारण्यात येणार असून, ॲनिमेशन, VFX आणि गेमिंगसाठी हे केंद्र असेल", असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारताच्या ऑरेंज इकॉनॉमीचे 3 स्तंभ या समिटच्या उद्धाटन सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही उपस्थितांशी संवाद साधला. " भारताच्या ऑरेंज इकॉनॉमीचे कंटेंट, क्रिएटिव्हिटी आणि कल्चर हे 3 स्तंभ असून काही वर्षांत जीडीपीमध्ये (सकल घरेलु उत्पन्न) याचा मोठा वाटा राहणार आहे", असे ते म्हणाले. "जगातील ॲनिमेशन मार्केट 430 अब्ज डॉलरहून अधिक असून पुढील 10 वर्षात ते दुप्पट होणार आहे. भारत ॲनिमेशन, ग्राफिक्स, गेमिंग आणि डिजिटल कंटेंटमध्ये मोठी झेप घेणार असून ही परिषद त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल. भारतीय चित्रपट आता 100 पेक्षा जास्त देशांमध्ये पोहोचले असून, परदेशी प्रेक्षक भारतीय कथा समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत, हे भारतीय कंटेंटचे यश आहे", असे पंतप्रधान मोदींनी नमूद केलं.



## माणसाला यंत्र बनावयचं नाहीये तर..

आपल्याला माणसाला यंत्र बनवायचं नाहीये तर संवेदनशील करायचं आहे. संगीत, नृत्य, कला यांना महत्त्व द्यायला हवे, असे सांगत पंतप्रधान मोदी यांनी भारताला सर्जनशीलतेचे जागतिक केंद्र करण्याचे आवाहन केले. जग नव्या शैलीत कथा सांगत असताना, भारताकडे हजारो वर्षांचा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे नव्या पिढीसमोर आकर्षक सादरीकरण करण्याचे आवाहनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले. 'WAVES 2025'च्या निमित्ताने भारतामध्ये प्रथमच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (IICT) मुंबईत स्थापन होणार असून, त्यासाठी केंद्र सरकारने ₹400 कोटींचा निधी मंजूर केला असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुदत्त, पी. भानुमती, राज खोसला, ऋत्विक घटक आणि सलील चौधरी यांच्या सिनेमातील योगदानाचे स्मरण करत विशेष टपाल तिकिटांचे अनावरण झाले.

# पोखरी ( घाट) गावात रंगलेल्या निकाली कुस्त्यांच्या दंगलीने कुस्तीप्रेमींची मने जिंकली

लिंबागणेश:- ( दि.०३ ) बीड तालुक्यातील पोखरी ( घाट) गावात दि.०२. शुक्रवार रोजी निकाली कुस्त्यांची दंगल लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या जिह्ला परिषद शाळेच्या प्रांगणातील मैदानात कुस्त्यांची दंगल पार पडली. बीडचे खा. बजरंग बप्पा सोनावणे, बीड जिह्लाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट राजेंद्र मस्के, बंकटस्वामी मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण मेंगडे महाराज,बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम महाराज,चोरमले महाराज यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुस्ती दंगलीस प्रारंभ झाला. प्रारंभी लहान मुलांच्या व कुस्तीपटुंच्या कुस्त्या झाल्या.मात्र त्यानंतर पुणे,कोह्लापूर,अकलुज, अहिल्यानगर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याच्या विविध भागातील कुस्तीपटुंच्या आखाड्यात कुस्त्या झाल्या. १००० रूपये पासुन ३१,००० रूपयापर्यंत बक्षिसांची रक्कम ठेवण्यात आली होती. अंतिम लढत गणेश काळे मौलाली तालिम संघ भुम आणि कृष्णा पवार यांच्यात होऊन गणेश काळे विजयी झाले. त्यांचा स्मृती चिन्ह आणि ३१,००० रूपये रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.



द्वितीय बक्षीस २५,००० रूपये बाळु बहिरवाल पाटोदा तालीम आणि तृतीय बक्षीस २१,००० रूपये मयुर कणसे आष्टी आणि संदिप लटके जामखेड या कुस्तीपटुंना विभागुन देण्यात आले. यावेळी पंचकमेटी म्हणून बाळासाहेब लेणे पुणे, गहिनीनाथ सिरसाट अहिल्यानगर, बाळासाहेब आवारे पाटोदा, दादासाहेब खिल्लारे आणि पोखरी (घाट) सरपंच बिभीषण मुळीक यांची उपस्थिती होती.कुस्ती बघण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींनी तसेच लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी महिलांची सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दादासाहेब खिल्लारे यांनी कुस्त्यांच्या दंगलीसाठी केलेले चोख नियोजन, परंडा येथील लक्ष्मण जाधव यांच्या हलगीच्या तालावर पाहुण्यांचे फेटा बांधून स्वागत,कुस्तीपटुंची ओळख, कुस्तीचे मोसीन अत्तार बार्शी यांची धावती कॉमेंट्री,कुस्तीपटुंना आखाडा जाम होऊन दुखापत होऊ नये यासाठी अधुनमधून रोटर फिरवून कुस्तीचे मैदान भुसभुशीत करणे आदी गोष्टी नजरेत भरणा-या होत्या याचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या शाळेप्रमाणेच ग्रामीण भागातील युवावर्ग व्यसनमुक्त होऊन मैदानी खेळाकडे वळावा, ग्रामीण भागातील कुस्तीपटुंना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात येणार असुन उत्तरोत्तर भव्यदिव्य स्वरूपात कुस्त्यांच्या दंगली भरवण्यात येणार असल्याचे आयोजक दादासाहेब खिल्लारे यांनी सांगितले.

## दहशतवाद्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत - मनोज जरांगे पाटील



दहशतवाद्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत असं मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हंटलं आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याविषयी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. संपूर्ण देश या विषयावर सरकारच्या सोबत असल्याचं देखील जरांगे म्हणाले. यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी म्हंटलं की, जेव्हा देशावर, धर्मावर हल्ला होतो तेव्हा अशा लोकांचा मुलाहिजा का बाळगावा? अशा विचारसरणी असणाऱ्या लोकांना ठेवायलाच नको. आपण म्हणतो आपल्याकडे शस्त्र साठा आहे, वेगवेगळे फेतर विमान आहेत, असं बरच काही आपण सांगतो. मग आपण त्याचा आता वापर करायला हवा, असंही जरांगे यांनी यावेळी बोलताना सरकारला आवाहन केलं.

# भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय!
## मनोरंजन:अभिजात मराठी ओटीटी प्लॅटफफॉर्मची घोषणा

बीड/प्रतिनिधी
महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला.या कार्यक्रमात मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.त्यामुळे मराठी



मनोरंजनाला एक नवे दालन खुले झाले आहे.

एआय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही मायबोली अभिमानाने उभी राहावी,यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे.जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

यावेळी मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले ,"मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे.असे मत उदय सामंत यांनी व्यक्त केले.'अभिजात मराठी' चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले "'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ असून'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार आहे.

# घरकुल लाभधारकांचे देयक (निधी) त्याच्या खात्यावर जमा करा- बाळू पवार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड -किनवट : किनवट तालुक्यातील घरकुल लाभधारकांचे देयक निधी त्यांच्या खात्यात लवकरात लवकर जमा करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) बाळू पाटील पवार यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.तालुक्यातील असंख्य लाभधारकांचे घरकुलाचे बांधकाम सज्जा लेवल व पूर्ण झालेले आहे. परंतु मागील ३ महिन्यापासुन त्यांना



पूर्ण घराचे काम करून सुध्दा निधी मिळाला नाही.त्यामुळे गरीब घरकुल लाभधारकांना आर्थिक अडचणीमुळे उर्वरित राहिलेले घराचे काम पुर्ण करता येत नाही. मे महिन्यात वादळीवाऱ्यासह पाऊस येण्याची शक्यता असते व जुन महिन्यामध्ये पाऊस सुरू होतो सदरील घरकुल लाभधारक हे आज रोजी घर पुर्ण नसल्यामुळे त्यांचा संसार उघड्यावर आहे.घरकुल बांधकाम झालेल्या लाभधारकांच्या खात्यावर घरकुल अनुदानाचा निधी लवकरात लवकर वर्ग करावा अशी मागणी बाळू पाटील पवार यांनी केली आहे.

# श्रृंगऋषीगडाचा पहिला नारळी सप्ताह, भव्य आयोजन
## पाथर्डी तालुक्यातील आडगाव येथे ५ ते १२ मे दरम्यान होणार, ग्रामस्थ सज्ज

गेवराई : प्रतिनिधी
गेवराई व शिरुर कासार तालुक्याच्या सिमेवर असलेल्या श्रृंगऋषीगडाचा पहिला नारळी सप्ताहाचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे पाथर्डी तालुक्यातील आडगाव ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र श्रृंगऋषीगडाचे मठाधिपती गुरूवर्य महंत सुरेशानंद महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते गुरूवारी दि.5 मे ते 12 मे सप्ताहाचा आयोजन करण्यात आले आहे. फुले टाकून 5 मे सोमवारी प्रारंभ करण्यात येणार आहे. या सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले असून ग्रामस्थ यासाठी सज्ज झाले आहेत. आठ दिवस चालणाऱ्या या सप्ताहात कीर्तन, कथा, प्रवचन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन असणार आहे.

महंत सुरेशानंदजी महाराज यांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम सुरु करण्याचा निश्चय श्रृंगऋषीगडावरील काल्याच्या किर्तनादरम्यान व्यक्त केला. यावेळी पाथर्डी तालुक्यातील छोटेसे गाव असलेल्या आडगाव ग्रामस्थांनी यासाठी पुढाकार घेतला होता. त्यानुसार या गडाच्या पहिल्याच नारळी सप्ताहाचा मान आडगाव ग्रामस्थांना मिळाला. ह.भ.प महत तुकाराम महाराज रुपनर वैकुंठगमनानंतर त्यांची परंपरा विद्यमान मठाधिपती महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सप्ताहाचे आयोजन चालु आहे. मात्र या नारळी सप्ताहामुळे गडाची एक वेगळी ओळख निर्माण होणार आहे. आदर्श सप्ताह कसा असतो, त्याचे उदाहरण या सप्ताहातुन दिसणार आहे. हा नारळी सप्ताहाला महाराष्ट्रातून लाखो भाविकांची उपस्थिती असणार आहे. दि.5 मे ते 12 मे हा या महोत्सवाचा कालावधी असून सप्ताहामध्ये दररोज दुपारी ३:३० ते ६ या वेळेमध्ये अक्षय महाराज पिंगळे यांची श्रीमद् भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे विलास महाराज गेजगे (गंगाखेड), विशाल महाराज खोले (मुक्ताईनगर), बाळु महाराज गिरगावकर (सेलू), समाधन महाराज शर्मा (केज), स्वामी जनार्दन महाराज (मच्छिंद्रगड), शिवा महाराज बावस्कर (खानदेश) ज्ञानेश्वर महाराज कदम (आळंदी) यांचे कीर्तन होणार आहे. सप्ताहाच्या आठव्या दिवशी मठाधिपती महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांचे जाहीर काल्याचे हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये परंपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ हे कार्यक्रम होणार आहेत. तसेच विविध गावातील गावकरी वतीने दररोज चे पंगतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ सज्ज झाले असून दिवस-रात्र परिश्रम घेताना दिसत आहेत.



## श्रृंगऋषीगडाचा यापुढे दरवर्षी नारळी सप्ताह

श्रृंगऋषीगडाच्या अधिपत्याखाली अनेक गावात अखंड हरिणाम सप्ताह पार पडतात. या सप्ताहात विविध संतांच्या अभंगांवर तत्वचिंतन केले जाते, ज्यामुळे भक्तांना धार्मिक ज्ञान आणि प्रेरणा मिळते. यामध्ये आता नारळी सप्ताहाची भर पडणार असून यावर्षी आडगाव ग्रामस्थांनी पहिला नारळी सप्ताह आयोजित केला आहे. आता यापुढे गडाचा प्रत्येक वर्षी नारळी सप्ताहाची परंपरा सुरू राहणार आहे, असे महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांनी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ४ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## जातनिहाय जनगणना

लोकसभेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांनी सातत्याने लावून धरलेली जातनिहाय जनगणनेची मागणी अखेर केंद्र सरकारने मान्य केली. बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पुढील जनगणनेत केंद्र सरकार जातनिहाय जनगणना करेल असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत घोषित केले. काँग्रेसनेच सातत्याने जातनिहाय जनगणनेला विरोध केल्याचा दावाही त्यांनी केला. म्हणजेच हा प्रकार ङ्गचोराच्या उलट्या बोंबाफ सारखा झाला. कारण जातनिहाय जनगणना करा अशी मागणी राहुल गांधी यांनी सातत्याने लावून धरली होती. पहलगाम हल्ल्याला लष्करी प्रत्युत्तर देण्याची रणनीती तयार केली जात असतानाच बुधवारी केंद्र सरकारने अचानक जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली. बिहार विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना हा निर्णय घेऊन भाजपने देशाच्या राजकारणाला कलाटणी देण्याचा प्रयत्न केल्याचे मानले जात आहे. पहलगाममधील हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांनी जात बघून नव्हे, धर्म विचारून हत्या केल्या, असा युक्तिवाद भाजपकडून केला जात असतानाच बुधवारी केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतल्यामुळे भाजपच्या वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. काँग्र`सचे नेते राहुल गांधी यांच्या दबावामुळे केंद्राला हा निर्णय घ्यावा लागला असून केंद्राला सलग तिस-यांदा धोरणात्मक माघार घ्यावी लागल्याची चर्चा आहे. जातनिहाय जनगणनेची मागणी करून जाती जातीमध्ये भेद निर्माण करणारे विभाजनवादी राजकारण काँग्रेस करत असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपच्या नेत्यांनी केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर धर्माच्या आधारावरील राजकारण भाजप व केंद्र सरकारसाठी अडचणीचे ठरू लागल्याने जातनिहाय जनगणनेचा उतारा शोधण्यात आल्याचे बोलले जात आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातगणनेच्या मुद्यावरून वर्षभराहून अधिक काळ केंद्र सरकार व भाजपला लक्ष्य केले होते. भाजप ओबीसींची मते मिळवत असला तरी सरकारी नोक-यांमध्ये ओबीसींना स्थान दिले जात नाही. भाजपने ओबीसींवर अन्याय केला आहे. जातगणना करून ओबीसींना आरक्षणाचा लाभ मिळवून दिला पाहिजे, असे राहुल गांधींनी लोकसभेत सांगितले होते. केंद्राच्या घूमजावमुळे भाजपला राहुल गांधींसमोर माघार घ्यावी लागल्याचे चित्र आहे. यापूर्वी राहुल गांधींनी भूसंपादन विधेयकाला विरोध केला होता. त्यानंतर वादग्रस्त तीन कृषि कायद्यांविरोधातील शेतक-यांच्या आंदोलनाला राहुल गांधींनी पाठिंबा दिला होता. हे दोन्ही कायदे रद्द करत मोदी सरकारला भूमिका बदलावी लागली होती. जातनिहाय जनगणनेची घोषणा करून सरकारने राहुल गांधींच्या धोरणाला एका अर्थी पाठिंबा व्यक्त केला आहे. राहुल गांधींनी केंद्र सरकारला झुकण्यास भाग पाडल्याचे भाजपच्या वतु`ळात बोलले जात आहे. मोदी सरकारने काँग्रेसच्या जातनिहाय जनगणनेचा व आरक्षणाचा दृष्टिकोन स्वीकारला असल्याचे मत राहुल गांधींनी व्यक्त केले. आम्ही जातनिहाय जनगणना करून दाखवू असे आश्वासन काँग्रेसने संसदेत दिले होते. त्याला मोदींनी विरोध केला होता. पण ११ वर्षांनंतर मोदी सरकारने जातगणनेची घोषणा केली. हा बदल का झाला ते माहीत नाही, असे म्हणत राहुल गांधींनी काँग्रेसच्या दबावापुढे केंद्र सरकार नमल्याचे अप्रत्यक्षपणे सूचित केले. देशात जनगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. आमचा त्यास पाठिंबा आहे. मात्र या जनगणनेची सुस्पष्ट अशी कालमर्यादा सरकारने स्पष्ट करावी. ही जनगणना नेमकी कधी पूर्ण होईल याचा कार्यक्रम जाहीर करावा अशी प्रतिक्रिया राहुल गांधी यांनी दिली. कोणत्याही कारणाने का होईना सरकारने निर्णय घेतला हे महत्त्वाचे आहे. भारतात २०११च्या जनगणनेनंतर अद्याप जनगणना झालेली नाही. २०२१ मधील जनगणना कोरोना महामारीच्या कारणामुळे स्थगित करण्यात आली होती. त्यामुळे लोकसंख्येची ताजी आकडेवारी उपलब्ध नाही. पुढील जनगणना कधी होणार याची सरकारने अजून घोषणा केलेली नाही. जात जनगणनेची मागणी केवळ मोदी सरकारच्या काळात झाली असे नाही. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए-२ राजवटीतही जातनिहाय जनगणनेची मागणी करण्यात आली होती. देशात प्रथमच जात जनगणना होत आहे, असे नाही. स्वातंत्र्यापूर्वी जनगणनेत सर्व लोकांची जात विचारली जात असे. १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जातीशी संबंधित माहिती गोळा न करण्याचा निर्णय घेण्यात आला. जातीविषयी तपशील विचारल्याने जाती व्यवस्थेची मुळे खोलवर जातील, अशी भीती होती. मात्र, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांची मोजणी सुरूच राहिली. म्हणजेच देशात या प्रवर्गातील लोकांची गणना केली जात होती. परंतु इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि सामान्य प्रवर्गातील लोकांची गणना केली जात नाही. जनगणना ही कोणत्याही देशाच्या आणि

# व्यसन एक आजार : हे सर्वांना समजून घेणे आवश्यक आहे

आज आपण प्रत्येक ठिकाणी पाहतो, कि तरुण पिढी व्यसनात डुबत चाललेली आहे. आणि तो व्यसन नावाचा डोह इतका मोठा आहे कि त्याची जाणीव सुद्धा एखाद्या व्यसनी व्यक्तीला नसते. तो त्याच्याच जगात मधमस्त होऊन जगत असतो, सर्व जगाचा, समाजाचा, कुटुंबाचा व स्वतःच्या आयुष्याचा विसर पडलेला हा व्यक्ती कोणाचं काहीच ना ऐकायला तयार असतो ना समजायला. नशा ही एक असा चक्रव्युह आहे कि एखाद्या चांगल्या व्यक्तिलाही कधी खेचत नेईल याचा नेम नाही. आजही तरुणाई कशी संपत चालली आहे याचे बरेच जिवंत उदाहरणे आपल्या अवतीभवती आपल्याला दिसत असतात.



एका व्यसनी व्यक्तीमुळे त्याचा उद्ध्वस्त झालेला परिवार, त्याच्या मुलांची स्वप्ने, पत्नीचा अपमान आणि आई वडिलांची सुन्न चेहरे ज्यांना सावरायलाही कोणीच समोर येत नाही अशा उद्ध्वस्त परिवाराला व त्या व्यसनात होरपडत असलेल्या व्यक्तीला मदतीचा जर कोणी हात देत असेल तर ते म्हणजे हिरिहिरीने, जिद्दीने पयत्न व परिवर्तन घडवून आणणारे व्यसनमुक्ती केंद्र.

अगदी जिवावर उदार होऊन कसल्याही परिणामांची पर्वा न करता 24 तास अलर्ट राहून काम करत असतात. कोणतीही अपेक्षा न ठेवता. आस फक्त इतकीच कि, एक व्यसनी व्यक्ती सुधारला तर त्याचं अख्ख कुटुंब सुखी व समाधानी होऊन जगेल.

व्यसन व व्यसनमुक्ती केंद्र याबद्दल बऱ्याच ठिकाणी अजूनही जनजागृती नाही. बऱ्याच लोकांना वाटते कि, केंद्रात गेला म्हणजे हा पूर्णपणे दुरुस्त व्हायलाच पाहिजे, याने पुन्हा कधीच व्यसन करू नये, आणि नशा केली तर ते संपूर्ण दोष त्या केंद्रावर टाकत असतात, हे एखाद्या कुटुंबाला वाटणे स्वाभाविक आहे, पण त्यांना त्यामागचं कारणच कळत नाही, हे समजून घेणे खूप आवश्यक आहे. व्यसन हा आजार आहे आणि तो कोणालाही, कधीही होऊ शकतो. यात तिळमात्रही शंका नाही. उदा. ताप आला..औषध घेतली म्हणून पुन्हा आपल्याला ताप येणार नाही का? किडनी स्टोन झाला, ऑपरेशनही केलं म्हणून पुन्हा होणार नाही का? होत असतेच...म्हणून आपण डॉक्टरांना दोष द्यायचा का? तसंच या व्यसनाचही आहे. व्यसनमुक्तीच्या उपचाराची पुन्हा पुन्हा गरज पडणे हे साहजिक आहे. आणि यामागच मुख्य कारण म्हणजे हा उपचार घेणाऱ्याची सकारात्मक व नकारात्मक मानसिकता. व्यसन हा शारीरिक व मानसिक आजार आहे, जो उपचाराबरोबर प्रबळ इच्छाशक्तीने बरा होतो. एखाद्याने व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेतल्यावर पुन्हा त्याला भरती करावं लागणार नाही असं नसते. पण प्रत्येकांना नेहमीच उपचार घ्यावा लागेल असेही नसते. काही जन एकाच उपचाराने रिकव्हर होतात, तर काही वारंवार उपचार घेतल्यानंतरही लवकर रिकव्हर होत नाही. त्यामागचं कारण म्हणजे इच्छाशक्ती व मानसिकता. कारण उपचार देणाऱ्या प्रमाणेच उपचार घेणाऱ्यानेही तो स्वीकारायला हवा तेव्हा तो उपचार पूर्णत्वास येत असतो. ही गोष्ट सर्वसाधारण लोकांना समजणे आवश्यक आहे. हे जर समजले नाही तर ते केंद्राचा उपचारही समजू शकणार नाही.

नशा कोणत्याही प्रकारची असो किंवा कोणत्याही कारणाने केली असो. पण प्रत्येक व्यक्ती व्यसनी असतो असे नाही. कारण कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती झाली तर परिणाम वाईटच होतील, मग ते जेवणच का असो ना. अती झालं की तेही अपचनच होऊन बाहेरच येत असते. तसेच वारंवार नशा केल्याने व्यक्ती व्यसनी बनत जातो. एकदा तो व्यसनी बनला की त्याला त्यातून बाहेर काढणे फार कठीण असते, पण अशक्य नसते. आणि अशाच अशक्य गोष्टी शक्य करण्याचं काम व्यसनमुक्ती केंद्र करत आहेत. म्हणून मला असं वाटते प्रत्येक कुटुंबीयांनी मनात कोणतीही शंका न ठेवता केंद्राच्या उपचाराला सहमती दिली पाहिजे, मदत केली पाहिजे, कारण सहमतीशिवाय हा उपचार पूर्ण होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्ती जो केंद्रात उपचार घेत आहे त्याच्यात सुधार व्हावी म्हणून अहोरात्र केंद्र व त्यातील कर्मचारी प्रयत्नशील असतात तेही फक्त तुमचं कुटुंब सुखी राहावं म्हणून.

सर्वांनी हा आजार, त्यावरील उपचार व केंद्रांची मेहनत समजून घेणे आवश्यक आहे. पण बऱ्याच ठिकाणी लोकांचे काही शब्द कानी पडत असतात. कोण नेईल केंद्रात, नेऊन काही फायदा नाही, फालतू पैसे जातात, काही होत नाही तिथे नेऊन, यांचे पैसे कमवायचे धंदे आहेत आणि असच खूप काही....! मला नाही वाटत की कोणी आजपर्यंत दारू दुकान वाल्यांना तुमचे पैसे कमवायचे धंदे अस म्हटलं असेल, प्रत्येक वेळी महागाईच्या नावाने मोर्चे आणि आरडाओरडा असतो, पण कोणी दारू महाग झाली म्हणून बोंबा मारत नाही. हे सर्वसाधारण लोकांना समजून घेणे आवश्यक आहे. उपचारासाठी खर्च केलेला पैसा कधी वाया (वेस्ट) जात नाही. कारण तो पैसा म्हणजे तुम्ही केलेले प्रयत्न आहेत. आणि प्रयत्न कधीच वाया जात नाही. हे परम सत्य आहे.

सरते शेवटी सांगण्याचे तात्पर्य इतकेच कि, व्यसन हा आजार आहे, वारंवार होणारा आजार आहे, पण योग्य उपचाराने तो बराही होतो, वारंवार होणाऱ्या या आजारासमोर केंद्र कधीच हार मानत नाही, तर पुन्हा आपल्या सेवेसाठी तितक्याच उस्फुर्ततेने सज्ज आणि तत्पर राहत असतो....!

तक्षशील
सौ. उषा शिलवंत घोडेस्वार,
संचालिका उज्वल व्यसनमुक्ती*
उपचार व पुनर्वसन केंद्र, साकोली
भंडारा
Mob. 8830089212

## तो राजहंस एक

रविवार होता,सुट्टीचा दिवस असल्याने सगळी कामे निवांतच आटोपली.मी पार्चमध्ये खुर्ची टाकून आरामात रेडीओवरील भावगीते ऐकत होतो.गाणं चालू होतं.गाण्याचे शेवटचे बोल कानावर आले,

“एके दिनी परंतु पिल्लास त्या कळाले,
भय वेड पार त्याचे वाऱ्यासवे पळाले.
पाण्यात पाहताना चोरूनिया क्षणैक,
त्याचेच त्या कळाले,तो राजहंस एक.”

गाणं जसं संपलं , तसं माज्या तोंडातून शब्द बाहेर आले, भास्कर.भास्कर आमच्याच गावातला एक गरीब मुलगा.वडील त्याच्या लहानपणीच वारले. आई धुणंभांडी करून घर चालवायची.भास्कर सकाळी पेपर टाकायचं काम करायाचा.त्यातून मिळणाऱ्या पैशातून तो शाळेचा खर्च पाहायचा.

भास्कर हुशार होता.शाळेत असताना त्याने पहिला नंबर कधी सोडला नाही. शाळेत होणाऱ्या स्पर्धेतही तो आघाडीवर असायचा.निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा,चित्रकलास्पर्धा यात तो नेहमीच पहिल्या तीनमध्येच असायचा,शाळेची मधली सुट्टी झाली की, मुले खेळायला जायची,हॉटेलात फिरायला जायची.भास्कर मात्र लायब्ररीत वाचनात गढून जायचा. त्यामुळे सगळे त्याला पी.के. म्हणजे पुस्तकी किडा म्हणायचे.

भास्करला नेहमीच पैशाची चणचण भासायची. त्यामुळे पुस्तके त्याला विकत घेता येत नसे. मी नेहमीच भास्करला मदत करायचो.आम्ही दोघे नेहमी एकाच बेंचवर असायचो, माझं डोक पहिल्यापासून शाळेत कधी चाललं नाही. त्यामुळे भास्करकडेच माझी पुस्तके असायची. तोही मला उत्तराला मदत करायचा.त्यामुळे मला परीक्षेची चिंता अन् नापास होण्याची भीती वाधी वाटली नाही. भास्कर फार अभ्यासू पण शांत होता,त्यामुळे बाकीची मुले त्याची नेहमीच खिल्ली उजवायचे.मला ही बाब नेहमी खटकायची,पण काही करता येत नव्हतं,म्हणतात ना ... पुढच्याचा हात धरता येतो,पण तोंड धरता येत नाही. दहावी झाली.मी कसाबसा दहावी पास झालो, आमचं कॉलेज सुरू झालं. कॉलेज सकाळी असल्याने भास्करने पेपर टाकायचं काम सोडलं.कॉलेज आमच्या गावापासून पाच किलोमीटर अंतरावर बहुळ या गावात होतं.गावात कॉलेजची सोय नसल्याने सगळी मुले तिथेच होती. भास्करला शिक्षणाच्या खर्चासाठी काम करणे आवश्यक होते.तेव्हा त्याने कुठे काम मिळते का याचा शोध घेतला.पण त्याला काम मिळाले नाही. खूप शोधाशोध केल्यावर त्याला गावातच गणपतशेठजींची एस.टी.टी. चालवण्याचे काम त्याला मिळाले अन् त्याच्या शिक्षणाचा प्रवासाला गती मिळाली.कॉलेज संपल्यावर भास्कर एस.टी.टी चालवण्याचे काम करी . त्याचा कॉलेजचा सर्व खर्च यातून निघत असे. बारावी झाली,मी शिक्षण सोडून व्यवसायात रमलो.पुढं बरेच दिवस भास्कर आणि माझी गाठभेट झाली नाही.

एक दिवस मला कॉलेजचे पत्र आले. कॉलेजने शिक्षाकदिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाला सर्व माजी विद्यार्थ्यांना आमंत्रित केले होते. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीच हा अनोखा आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित केला होता.

मी कॉलेजला पोहचलो.तेव्हा जवळ जवळ सगळेच विद्यार्थी आले होते.कोण काय करतो याबद्दल चर्चा झाली.त्यामध्ये काही शेती,काही नोकरी तर काहीजण माझ्यासारखेच व्यवसाय करणारे होते.तेव्हा अचानक एकजण बोलला,

“तो पी.के , तुला भेटतो का नाय रे ?”

“बरीच वर्ष त्याची अन् माझी गाठभेट नाही.” , मी उत्तरलो.

“आता त्याला पी .के.नाय,बॅटरी म्हणावं लागेन बॅटरी,” गण्या बोलला.

“का रे?” एकाने विचारलं.

“अरे पुस्तके वाचून वाचून आता त्याला चष्मा लागला असेल ना?”,असे म्हणून गण्याने त्याला टाळी दिली.

तेवढ्यात एका लाल दिव्याची गाडी कॉलेजपुढे थांबली. तशा सगळ्यांच्याच माना तिकडे वळाल्या.ड्रायव्हरने घाईघाईने उतरून मागचा दरवाजा उघडला.त्यातून भास्कर उतरला. सर्वजण आवाक् होऊन त्याच्याकडे पाहत होते.

तेवढ्यात गर्दीतून कुणीतरी ओरडलं, “कलेक्टरसाहेब आलेत”.

भास्कर आला तसा सरांपुढे वाकला.सरांना नमस्कार करून त्याने त्यांची खुशाली विचारली. भास्कर एवढा मोठा झाला तरी पहिल्यासारखाच नम्र आणि शांत होता.शाळा,कॉलेजने दिलेले संस्कार तो विसरला नव्हता.आजच्या तरुणांना तो एक आदर्शच व्हावा,असंच त्याचं व्यक्तीमत्व होतं.

त्यानंतर त्याने आम्हा सर्वाबरोबर दिलखुलास गप्पा मारल्या.एवढेच नव्हे तर त्याची खिल्ली उडवणाऱ्या मुलांशीही त्याने मनमोकळ्या गप्पा मारून सर्वांची विचारपूस केली.कार्यक्रम संपल्यावर तो गाडीत बसून गेला.आम्ही सर्वांनी त्याला निरोप दिला.त्याने हालाकीत काढलेले दिवस,परिस्थितीशी दिलेली कडवी झुंज,खिल्ली उडवणाऱ्या मुलांशीही मारलेल्या मनमोकळ्या गप्पा हे सर्व पाहिल्यावर मनात आले, तो आला ... त्याने पाहिलं ... त्याने जिंकलं ...

**सचिन बेंडभर**
**पिंपळे जगताप, पो- करंदी**
**ता- शिरूर जि- पुणे 412208.**
**Mob- 9822999306**
**Mail- sachinbendbhar3@gmail.com**

# माझा अंघोळ करतानाचा व्हिडीओ: करुणा शर्माच्या आरोपाने खळबळ, आणखी एक याचिका दाखल

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. करुण शर्मा यांनी न्यायालयात आता आणखी एक याचिका दाखल करत मोठी मागणी केली आहे. धनंजय मुंडेंची जवळपास पाच हजार कोटी रुपयांची संपत्ती आहे, त्यासंदर्भात आज मी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. जोपर्यंत आमचा निकाल लागत नाही, तोपर्यंत ही संपत्ती कोणालाही खरेदी, विक्री करता येऊ नये, सगळ्या संपत्तीवर स्टे आणावा अशी मागणी मी याचिकेत केली असल्याचं करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे. यावेळी बोलताना त्यांनी काही गंभीर आरोप देखील केले आहेत. नेमकं काय म्हणाल्या करुणा शर्मा?

‘बांद्रा न्यायालयात आमची तारीख होती, घरगुती हिंसाचाराची या प्रकरणात आमच्या वकिलांनी तीन याचिका दाखल केलेल्या आहेत. ज्यामध्ये दोन लाख रुपये देण्याच्या निर्णयासंदर्भातील एक याचिका आहे. ज्या दिवशी कोर्टानं निकाल दिला, त्या दिवसापासून मला दिवसरात्र घाणेरड्या धमक्या दिल्या जात आहेत. माझे खोटे व्हिडीओ टाकण्याचा प्रयत्न देखील करण्यात आला आहे, ज्यामध्ये मी नाहीये, मी या संदर्भात तीन वर्षांपूर्वी देखील तक्रार दिलेली आहे. मात्र या संदर्भात अजूनही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाहीये, आणि आता तर ज्या व्हिडीओत मी नाहीच



असे खोटे व्हिडीओ पोस्ट करून माझी बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप करुण शर्मा यांनी केला आहे. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, मला सतत धमक्या येत आहेत, माझे अंघोळ करतानाचे व्हिडीओ टाकण्याची धमकी, माझ्या मुलीला उचलून घेऊन जाण्याची धमकी मला हे लोक दररोज माझ्या व्हॉट्सअपवर देत आहेत. तुम्ही कोर्ट केस माघारी घ्या, तुम्ही धनंजय मुंडे यांची आमदारकी वापस घेण्यासंदर्भात जी याचिका दाखल केली आहे, ती माघारी घ्या. घरगुती हिंसाचाराची केस माघारी घ्या, असे हो लोक मागण्या करत आहेत, आणि त्यासाठी मला धमकावलं जात आहे, त्यासंदर्भात देखील मी याचिका दाखल केलेली आहे. धनंजय मुंडेंची जी प्रॉपर्टी आहे, त्या पाचशे कोटी रुपयांच्या संपत्तीचे वरीजनल कागदपत्रे माझ्याकडे आहेत. त्यांची पाच हजार कोटी रुपयांची संपत्ती आहे, त्यासंदर्भात आज मी न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. आमचा जोपर्यंत निकाल लागत नाही, तोपर्यंत ही संपत्ती कोणालाही खरेदी, विक्री करता येऊ नये अशी माझी मागणी आहे. सगळ्या संपत्तीवर स्टे आणला जावा, अशी माझी मागणी असल्याचं करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे.

## लाडक्या बहिणींनो गुड न्यूज... अकाऊंट चेक केले का?; किती झाले जमा?



आज येईल, उद्या येईल म्हणून लाडकी बहीण योजनेच्या हप्त्याची आस लागून राहिलेल्या लाडक्या बहिणींना अखेर गुड न्यूज मिळाली आहे. एप्रिल महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात आजपासून जमा व्हायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे या योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांनो पटापट तुमचे खाते चेक करा. तुमच्या खात्यावर तुमची रक्कम आलेलीच असेल. सरकारने एप्रिल महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यात जमा केले असले तरी मे महिन्याच्या हप्त्याची अपडेट अद्याप आलेली नाही. तेही पैसे लवकरच खात्यात जमा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. लाडकी बहीण योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांच्या खात्यात आजपासून रक्कम जमा झाली आहे. महिलांच्या खात्यात 1500 रुपये जमा झाले आहेत. ही रक्कम एप्रिल महिन्याची आहे. मे महिन्याची रक्कम अजून यायची बाकी आहे. त्याबाबतची माहिती अद्याप देण्यात आलेली नाही. मात्र, एप्रिल महिन्याची रक्कम तुमच्या अकाऊंटमध्ये जमा झाली असून ही रक्कम तुम्ही चेक करू शकता.


## अमरावती महानगर पालिका झाली डिजिटल



अमरावती जिह्ला शंब्दभूमी प्रतिनिधी गणेशराव मानकर : अमरावती महानगरपालिकेचे कामकाज डिजिटल पद्धतीने व अधिक जलद गतीने व्हावे याकरिता महानगरपालिका प्रशासनाने क्यू आर कोड सुविधा उपलब्ध करून दिली आहे. क्यू आर कोड स्कॅन करून आता नागरिक थेट तक्रार नोंदू शकतील व महानगरपालिकेचे अधिकृत ॅप सुद्धा डाऊनलोड करू शकते. तसेच महानगरपालिकेतील विविध सुविधांचा लाभ घेण्याकरिता सुद्धा क्यू आर कोड चा वापर करू शकतील.

## पाण्यासाठी शहरातील नागरिकांना भटकंती करण्याची वेळ-वर्षाताई जगदाळे

बीड । प्रतिनिधी शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी असणाऱ्या बीड नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी नेता अंधारे यांनी तुघलकी कारभार सुरू केला आहे का? शहरातील नागरिकांना २५ दिवसाला पिण्याचे पाणी येत नसल्याने याचा जाब विचारण्यासाठी नगरपालिकेत गेलेल्या मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांना आपली जबाबदारी पाण्याची नसल्याचे सांगत हात वर करणाऱ्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची तात्काळ बीड मधून निलंबित करत हकलपट्टी करण्याची मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले असून बीड नगरपालिकेचा कारभार नीता अंधारे यांच्या कार्यकाळात दयनीय झाला आहे. शहरात साचलेले कचऱ्याचे ढीगारे पसरलेली रोगराई रात्रीच्या वेळी मुख्य ठिकाणी असलेले पथदिवे बंद यासह शहरात मोकाट जनावरांचा वावर तु ंबलेल्या नाल्या यासह शहरातील नागरिकांना पिण्याचे मुबलक पाणी



मिळत नसल्याने शहरात पाणी बानी असल्याचे चित्र दिसत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या सह मनसेचे शिष्टमंडळ कधीही हजर नसलेल्या नीता अंधारे यांच्या भेटीसाठी गेले असता तब्बल ११४ कोटी रुपयांची जलजीवन योजना जल जीवन विभागाकडे देण्यात आली असल्याचे म्हणत आपली जबाबदारी फक्त पाणी सोडण्याची आहे . या पलीकडे आम्ही काही करू शकत नाही पाणी न आल्यास आम्ही काहीच करू शकत नसल्याचे सांगत तुम्हाला लेखी स्वरूपात देते असल्याची उर्मट भाषा मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी वापरली. नीता अंधारे यांच्या विरोधात अनेक तक्रारी झाल्या आहेत मात्र मुख्याधिकाऱ्यांचे लाड कशामुळे पुरवले जात आहेत निष्क्रिय व भ्रष्टाचारी असलेल्या नीता अंधेरीची बदली करण्यासाठी नगर विकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मु ंबई येथे जाऊन भेट घेणार असल्याचे मनसेच्या वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. बीड नगरपालिकेला आलेला कर व नळपट्टी घरपट्टी बांधकाम बनवण्यासाठी लागणारे पैसे हे कुठे जातात. दहा कोटी रुपयांचे टेंडर जिल्हाधिकारी रद्द केले यामागे नीता अंधारे ची बुद्धी होती आता पाण्यासाठी लोकांना त्रास देणाऱ्या या मुख्यअधिकारी नीता अंधारे यांना बीड शहरातून निलंबित करत अकलपट्टी करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून. मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या विरोधात नगरपालिकेत पुन्हा बोंबाबोंब आंदोलन करणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. वर्षाताई जगदाळे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे तथा शहराध्यक्ष अमरजान पठाण आदी मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मान विक्रांत शिरसाट यांना प्रदान



मुंबई (प्रतिनिधी): साहित्य, पत्रकारिता आणि समाजप्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल श्री.विक्रांत शिरसाट यांना आर्यरवी एंटरटेनमेंट आयोजित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव पुरस्कार वितरण सोहळा (वर्ष ३रे) अंतर्गत 'गौरव सन्मानपत्र' प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात देशभरातून विविध क्षेत्रांतील प्रतिभावान व्यक्तींना गौरविण्यात आले. श्री. विक्रांत शिरसाट यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक कार्यात नेहमीच सक्रीय सहभाग घेतला आहे. त्यांचे लेखन, संपादन आणि बातम्यांमधील समाजभान यामुळे ते वाचकप्रिय ठरले आहेत. सन्मानपत्रात नमूद करण्यात आले आहे की, "आपले कार्य निश्चितच प्रशंसनीय व प्रेरणादायी आहे. समाजजागृतीसाठी आपले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे." विविध प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांतून त्यांनी दिलेल्या सेवेची दखल घेत आयोजक मंडळाने त्यांना सन्मानित केले. या गौरवाने श्री. विक्रांत भिमराव शिरसाट यांच्या कार्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे मत विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी व्यक्त केले आहे.

## निधन वार्ता



वरखेड येथील भीमराव विठोबा ढोकणे यांचे अल्पशा आजाराने निधन त्यांचे वय 80 वर्ष होते त्यांच्या पश्चात मुलगा सून आणि नातवंड आहेत सुनील ढोकणे यांचे ते वडील होते

## केज नगरपंचायतीच्या वतीने शिक्षक कॉलनी भागात टँकरने पाणीपुरवठा सुरु

केज । प्रतिनिधी केज शहरातील तहानलेल्या शिक्षक कॉलनी भागात आजपासून टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. केज नगरपंचायतला केज शहरातून सर्वाधिक महसूल देणाऱ्या शिक्षक कॉलनी भागात पाणी पुरवठा योजना नसल्यामुळे या भागात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत असते. या वर्षी कडक उन्हाळा पडल्यामुळे या भागातील बोरवेल पूर्णपणे आटले आहेत. पाण्यासाठी वणवण भटकत पाणी मिळवणे किंवा विकत पाणी घेणे येवढेच पर्याय सद्या या भागातील रहिवासी लोकांच्या नशिबी आले होते. परंतु केज नगरपंचायतीच्या वतीने आज पासून शिक्षक कॉलनी भागात



टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्यामुळे या भागातील रहिवासी जन विकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड , नगरसेवक बाळासाहेब गाडवे, बालाजी जाधव व नगरपंचायत विभागाचे आभार मानत आहे. शिक्षक कॉलनी भागातील पत्रकार प्रकाश मुंडे यांचे चिरंजीव राहुल मुंडे यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले होते .राहुल मुंडे याच्या स्मरणार्थ या भागात नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या राहुल मु ंडे प्रतिष्ठान, युवा नेते खय्युम शेख , पत्रकार प्रकाश मुंडे, पिटू भैय्या तांदळे, एम डी घुले सर, अरुण बप्पा धस सर ,सुधाकर ढाकणे सर, अमोल धस, सोनू धस, रुद्रा तांदळे, रतन वाघमारे व नागरिक तसेच महिला मंडळ यांनी पाण्याची टाकी व पाइपलाइनने पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करावा ही मागणी लावून धरली होती ही मागणी मान्य केल्यामुळे गटनेते हारुण भाई इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## तिसऱ्या मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे सर्जनशील इकोसिस्टम

मुंबई वृत्तांत :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बीकेसी, मुंबई येथे आज 'वेव्ह्ज 2025' मध्ये 'स्टुडिओ आणि तंत्रज्ञान' विषयावर राऊंड टेबल चर्चा संपन्न झाली. यावेळी बोलताना त्यांनी मुंबई हे सर्जनशीलतेचे केंद्र असल्याचे नमूद करून, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात महाराष्ट्राचे जागतिक स्थान अधिक मजबूत करण्यासाठी तिसऱ्या मुंबईत (नवी मुंबई परिसरात) आंतरराष्ट्रीय दर्जाचे सर्जनशील इकोसिस्टम निर्माण केले जाणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, नवी मुंबईत जागतिक दर्जाच्या थीम पार्कसाठी राज्य शासन सकारात्मक आहे. यासाठी प्राईम फोकस आणि गोदरेजसोबत दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoUs) करण्यात आले असून, यामुळे मुंबईमध्ये अत्याधुनिक स्टुडिओ सुविधा उपलब्ध होतील. याशिवाय, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने उभारल्या जाणाऱ्या आयआयसीटी (IICT) संस्थेमार्फत सर्जनशील उद्योगांसाठी विशेष अभ्यासक्रम राबवले जातील, जे नव्या पिढीला करिअरची नवी दारे खुली करतील. ई-स्पोर्ट्स क्षेत्रासाठी धोरणात्मक पाठबळ, प्रशिक्षण आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, चित्रपट, वेबसिरीज, जाहिराती आणि इतर व्हिज्युअल कंटेंटच्या चित्रीकरणासाठी परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान करण्यात आली आहे. आता नोंदणी, अर्ज व शुल्क भरणे आणि आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर



केवळ सात दिवसांत परवानगी मिळते. या महत्त्वाच्या बैठकीला विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, उद्योजक, स्टार्टअप्स, क्रिएटिव्ह इंडस्ट्रीचे प्रतिनिधी, अभिनेते आमिर खान, एफआयसीसीआयचे आशिष कुलकर्णी, पी. जयकुमार रेड्डी तसेच वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते.

## माय माऊली.

देवी माझी आई माझी
उचलत पोटात भार
दिला तिने आकार
कळला जीवनाचा सार.

पोटातून काढलं बाहेर
तोडली तिने नाड
वाढवण्या प्रदीप बाळ
सोसत स्वतः कळ.

केली माझी वाढ
झटली रातदिन पार
सोडतं दुग्ध धार
धरत मायेचा पदर.

तिचा अंश पृथ्वीवर
भरलं रक्तातुन उदर
रुजवला संस्कार अंगभर
ऋण तिचं जीवना वर .

काळजी तिला फार
जगवण्या आपलं पोर
वडिलांच्या सोबतीने संसार
दोघांचं प्रेम फार.

घास दिला मायेचा
हात आधार आईचा
स्वास माय माऊलीचा
लेक मालु आईचा.

**प्रदीप मनोहर पाटील**
**गणपूर ता. चोपडा**
**जिल्हा. जळगाव**
**मो. 9922239055**

## संजय सावंत यांनी जि.प.प्राथमिक शाळा नफरवाडी येथील वर्ग सातवीच्या प्रथम द्वितीय व तृतीय येणाऱ्यांना विद्यार्थ्यांना ठेवले बक्षीस

पाटोदा । प्रतिनिधी तालुका पाटोदा पासून जवळ असणाऱ्या नफरवाडीचे भूमिपुत्र श्री संजय यलकनाथ सावंत सर यांनी गावचे ऋण फेडण्यासाठी एक आगळी वेगळी योजना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नफरवाडी येथील वर्ग सातवी मध्ये दरवर्षी गुनानुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना पैशाच्या स्वरूपात बक्षीस योजना सुरू केली आहे यामध्ये सर्व प्रथम कु. दिव्या बाळू तांबे आली असून तिला ९७.५० % गुण मिळाले असून सर्व द्वितीय कु. ऐश्वर्या अशोक दराडे आली असून तिला ९६.८८ % गुण मिळाले आहेत तर सर्व तृतीय येणार विद्यार्थी चि. प्रशांत राजेंद्र चव्हाणआला आहे त्याला ९६ पॉईंट २२ % गुण मिळाले आहे हा कार्यक्रम महाराष्ट्र दिनाचे औचित साधून घेण्यात आला याप्रसंगी गावातील सरपंच उपसरपंच तसेच सर्व सदस्य तसेच शालेय समिती अध्यक्ष व सर्व सदस्य पोलीस पाटील ग्रामसेवक व गावातील जेष्ठ नागरिक तरुण युवक वर्ग या कार्यक्रमासाठी




उपस्थित होता. नफरवाडी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री खंडागळे सर श्री मुरूम सर श्री राऊत सर श्रीमती काकडे मॅडम श्रीमती कदम मॅडम श्रीमती वावरे मॅडम शालेय स्टाफ अतिशय मेहनती असून निरनिराळ्या परीक्षेला विद्यार्थी बसून तालुकाच नाही तर जिल्हा आणि राज्यातून मूल प्रथम द्वितीय तृतीय आणण्यासाठी आणण्यासाठी धडपड करत आहेत वेळप्रसंगी ज्यादा तास घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत आहेत ही गोष्ट सार्थ अभिमानाची वाटते या शिक्षकांमुळे व मुख्याध्यापकांमुळे पाटोदा येथून काही प्रमाणात मुले

## दहशतवादी हल्ला झाल्यापासून, भारत सरकारचे सहा मोठे निर्णय, ज्यामुळे पाकिस्तानचं कंबरड मोडलं

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यामध्ये 26 जणांना आपला जीव गमवावा लागला, तर अनेक जण जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे पाकिस्तानवर दबाव वाढला आहे. भारतानं सिंधू नदी पाणी वाटप कराराला स्थगिती दिल्यानंतर दोन्ही देशांमध्ये तणावाचं वातावरण आहे. पाकिस्तानचा जळफळाट झाला असून, पाकिस्तानच्या नेत्यांकडून सातत्यानं युद्धाच्या पोकळ धमक्या देण्यात येत आहेत. दरम्यान भारतानं गेल्या 24 तासांमध्ये तीन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत, या निर्णयामुळे पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळल्या असून, कंबर मोडली आहे. दहशतवादी हल्ला झाल्यापासून ते आजपर्यंत पाकिस्तानविरोधात कारवाईच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारकडून सहा मोठे निर्णय घेण्यात आले आहेत, त्याबद्दल जाणून घेऊयात.

पाकिस्तानी जहाजांना प्रतिबंध – यासंदर्भात डीजीएसकडून आदेश जारी करण्यात आला आहे, या आदेशानुसार पाकिस्तानी झेंडा असलेल्या कोणत्याही जहाजाला भारताच्या कोणत्याही बंदरामध्ये प्रवेश देण्यात येणार नाहीये, सुरक्षिततेच्या कारणामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं डीजीएसकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

आयात -निर्यात बंद – भारतानं पाकिस्तानविरोधात आणखी एक मोठं पाऊलं उचललं आहे. सर्व प्रकारची



आयात, निर्यात बंद करण्यात आली आहे. भारताच्या या निर्णयामुळे पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळल्या जाण्याची शक्यता आहे.

टपाल सेवा बंद – भारत सरकारने पाकिस्तानशी संबंधित सर्व प्रकारची टपाल सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच पाकिस्तानी चॅनल आणि वेबसाईट देखील बॅन करण्यात आले आहेत.

पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द – पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द करण्यात आला असून, त्यांना तातडीनं भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सिंधू जल करार स्थगित – भारतानं सिंधू जल कराराला स्थगिती दिली आहे, भारताच्या या निर्णयामुळे पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे. या निर्णयाचा पाकिस्तानला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

हवाई हद्द बंद – भारतानं पाकिस्तानच्या विमानासाठी आपली हवाई हद्द बंद केली आहे, या निर्णयामुळे पाकिस्तानी विमान कंपन्यांना मोठा फटका बसू शकतो, हवाई हद्द बंद झाल्यामुळे विमानांना दुरून प्रवास करावा लागणार आहे, याचा मोठा फटका त्यांना इंधनाच्या रूपानं बसू शकतो.

## धुणेवाली...

माझ्या लहानपणी म्हणजे अंदाजे ४०,४५वर्षा पूर्वी चा हा काळ.तेव्हा भांडे घासायला बाई असे. धुणे धुवायला पण बाई असे.दुपारच्या वेळी बाई धुण्यासाठी बाई येत असे.आमच्या घरी पारू नावाची गोंडिन बाई कामाला यायची. टळटळीत उन्हात ती यायची.काळी सावळी उंच पारू लुगड नेसायची.आपल्या प्रसन्न हसूने घर फुलवायची.तिच्या सोबत तिची दोन पोरं येत. येसोंता,झिप्रीआणी न्हान बाई.येसोता म्हणजे यशवंता १२, १३चां.तो आईला कामात मदत करी.झिप्री न्हान बाईला सांभाळायची.पारू आणि मुलं रोज गुळाचा काळा चहा प्यायची. माझी आई मुलांना रोज खायला द्यायची. धुण धुतलं की पारू.इतर काही काम करायची. मिरच्या कुटनं,सांडगे घालणे मग उन उतरत असताना ते घरी. जात.असे बरेच वर्ष चालले. यसोंता मोठा झाला.पारू मगशेतीच्या कामावर जाऊ लागली.आमचं घर सोडलं.पण अधि मधी ती यायची.मग रामा आणि त्याची बायको धुण धू यायचे.मी. तिला रामाची सीता म्हणून चिडवायचे.ती हसायची.ते धुण घेऊन नदीवर जायचे.दोघं मिळून धुण धुवायचे. रामा रोडकासा होता.लोक त्याला केडु म्हणून आवाज देत.सीता जरा लठ्ठ होती. सुखानं संसार करायची. रामा इतरही गावात काम करी. नागपंचीच्या जत्रेत रामा साडी नेसून स्त्री पार्ट करी.खूप नाचं करी. लचकत मुरडत नागीण डान्स करी.लोकं पैसे आणि गुलाल उधळत. रामा खूप बडबड्या होता.कपडे धुताधुता साऱ्या गावाची वार्ता सांगे. खूप चहाड्या सांगायची,बायकांमध्ये बसायची,गप्पा करायची त्या सवय होती.. ह्याजोडप्याला मूलबाळ नव्हते.पण ती खंत ही त्यांना न्हवती.रामाची सीता मात्र निर्मळ होती.नेहमी हसत राहायची.मला ती आवडा य ची.माझी आई तिला नेहमी जुन्या साड्या ,कपडे देत असे.कधी तांदूळ, गहू,कधी गूळ असे काहबाही तिला आई देत असे. गुळाचा चहा आल घालून तिला आवडे. ती माझा लाड करी,"लै साजरी हाय माय तू.मोत्ती व्हय.तुया लगणाले बलाव.लाडू खायाले" असे म्हणत माझ्या तोंडावरून नेहमी हात फिरवे.तेव्हा तिचे डोळे नकळत भरून येत. दिवस सरत होते.गावात बदल होत गेले. नळ आलेत.रस्ते सिमेंट चे झाले.नवा बदल होत होता.जुने माणसं थकत होते. एक दिवस बातमी आली रामाची सीता गेली.मन सुन्न झालं.नकळत डोळे पाणावले.हळूहळू रामानेही कामं सोडली. नवा दिवस उजाडत होता. नवा प्रकाश नवीन वारे वाहात होते. पण कुठेतरी सीतेचे भरले डोळे अजूनही मला अस्व स्थ करतात.

गावी कधतरी नदीवर गेलं की राम सीतेची आठवण होते.नकळत डोळे भरून येतात.

अनुपमा मुंजे
नागपूर

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ४ मे २०२५
https://lokaarambh.com



# ना दारुगोळा ना हिम्मत, ४ दिवसांत पाकिस्तान भारतापुढे फुस्स होणार

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर हल्ला करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हीच शक्यता लक्षात घेता पाकिस्तानकडून भारताला पोकळ धमक्या दिल्या जात आहेत. आमच्याकडे अणुबॉम्ब आहे, आम्हीही तयार आहोत, अशा प्रकारची धमकी पाकिस्तान भारताला देत आहे. मात्र भारत आणि पाकिस्तान यांच्यात खरंच युद्ध झालं तर पाकिस्तान भारतापुढे चार दिवसही टिकणार नाही. पण हे नेमकं कसं होणार? हे जाणून घेऊ या.. पाकिस्तानने नुकतेच इस्रायलला शस्त्रास्त्र पुरवठा केला पाकिस्तानच्या युद्धासाठीच्या क्षमतेवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. सुरक्षा एजन्सीजनुसार टोकाचं युद्ध झालंच तर पाकिस्तानकडे फक्त चार दिवस पुरेल एवढाच दारुगोळा आहे. पाकिस्तानने नुकतेच इस्रायलला शस्त्रास्त्र पुरवठा केला आहे. त्यानंतर पाकिस्तानच्या शस्त्रागारातील शस्त्रे कमी झाले आहेत. त्यामुळेच भारतापुढे पाकिस्तान जास्त दिवस टिकणार नाही, असे म्हटले जात आहे. पाकिस्तानकडे दारुगोळा नाही? मिळालेल्या माहितीनुसार पाकिस्तानची सेना प्रामुख्याने M109 हॉवित्झर,



BM-21 मल्टीपल रॉकेट लॉन्चर तसेच नुकतेच आणण्यात आलेल्या SH-15 माउंटेड गन सिस्टमवर युद्धात अवलंबून आहे. मात्र सुरक्षा एजन्सीनुसार ही शस्त्र वापरण्यासाठी पाकिस्तानकडे दारुगोळा फार कमी आहे. पाकिस्तानच्या SH-15 या नव्या तोफांसाठी दारुगोळा नाहीये. त्यामुळेच भारतासोबत युद्ध झालेच तर पाकिस्तानकडे फक्त चार दिवस टिकेल एवढेच युद्धसामान आहे. पाकिस्तानने युक्रेनला काय काय दिलं? पाकिस्तानची आर्थिक स्थिती चांगलीच बिकट आहे. या देशाच्या डोक्यावर मोठे कर्ज आहे. परकीय चलनसाठाही कमी आहे. मिळालेल्या माहितीनुसार पाकिस्तानच्या सेनेला राशन, तेल यामध्येही कपात करावी लागत आहे. पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख जनरल बाजवा यांनीच पाकिस्तान भारतापुढे युद्धात जास्त दिवस टिकू शकणार नाही, असं मान्य केलं होतं. 2 मे 2025 रोजी स्पेशल कॉर्प्स कमांडर्स कॉन्फरन्समध्येही पाकिस्तानी सेनेच्या ऑफिसर्सने सध्या लष्कराची परिस्थिती बिकट असल्याचे मान्य केले होते. पाकिस्तानची सध्याची ही परिस्थिती पाहता हा देश भारतापुढे युद्धात चार दिवसही टिकणार नाही, असा कयास व्यक्त केला जात आहे. प्रत्यक्ष मात्र युद्ध चालू झालेच तर इतरही देश पाकिस्तानला मदत करू शकतात. त्याच पद्धतीने भारताच्या बाजूने काही देश उभे राहू शकतात. त्यामुळे युद्धात नेमकं काय होणार? असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.


## म्हणजे विषयच संपला, पहलगाम हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना उदयनराजेंचा संताप, केली मोठी मागणी

पहलगामध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रचंड तणावाचं वातावरण आहे. भारतानं पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना खासदार उदयनराजे भोसले यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. नेमकं काय म्हणाले उदयनराजे भोसले? त्यांना जिव घेण्याचा अधिकार नाही. असे हल्ले वारंवार घडत आहेत. प्राण्यांमध्ये सर्वात हुशार माणूस समजला जातो. परंतू आता प्राणी परवडले असं म्हणण्याची वेळ आली आहे, या घटनेमुळे वेदना होतात, गुन्हेगारी थांबवायची असेल तर कठोर कारवाई झालीच पाहिजे, त्यांना



सुट्टी देता कामा नये, अशा लोकांचा खात्मा झालाच पाहिजे, दहशतवादी आणि त्यांचे कॅम्प उडवले पाहिजेत असं उदयनराजे यांनी म्हटलं आहे. त्यांचा ट्रेनिंग कॅम्पच उद्ध्वस्त करून टाका म्हणजे विषयच संपतो, जागतिक परिषदा होतात, त्यामध्ये वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधी असतात. त्यामध्ये अनेकदा हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. आता यावर तोडगा काढला पाहिजे, हे आणखी किती दिवस चालणार? किती लोकांचे बळी जणार असा सवाल यावेळी उदयनराजे यांनी केला आहे. दरम्यान राज्यात शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषा सक्तीची करण्यात आली आहे, यावर देखील उदयनराजे यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली आहे. वस्तुस्थितीशी गाठ बांधली पाहिजे, जग पुढे चाललं आहे. दररोज वेगाने डेव्हलपमेंट होत आहे. 21 वं शतक आहे. या धावत्या जगात आपल्याला उंचीवर जायचं असेल तर आपण समजून घेतलं पाहिजे. प्रत्येक भाषेला महत्त्व आहेच असं त्यांनी म्हटलं आहे. कॉलेजच्या जीवनातला एक किस्सा सांगतो, फर्ग्युसनला मराठी मिडीयममधली मुले माझ्या बाजूच्या रूममध्ये होते, ती टॉपर होती, त्यांच्याकडे बघून वाईट वाटायचं, डबल अभ्यास करावा लागायचा, खूप जवळून बघितलेलं आहे, मी हे सर्व. पहिल्यांदा इंग्लिशचं ट्रान्सलेशन करायचं आणि मग त्याचा अभ्यास कारायचा, हेच जर त्यांनी इंग्लिशमध्ये शिक्षण घेतलं असतं तर त्यांना आणखी फायदा झाला असता, त्यामुळे प्रत्येक भाषा महत्त्वाची असल्याचं उदयनराजे यांनी म्हटलं आहे.

## आमची मैत्री जुनी आहे, पण मी त्याच्याकडे काही मागत नाही, शिंदे यांच्याकडे पाहात नानांचा डायलॉग



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा येथील दरे गावात गेले असता तेथे अभिनेते नाना पाटेकर यांनी शिंदे यांच्या शेताला भेट देत अननसाचे झाड देखील लावले. यावेळी नाना पाटेकर यांनी एकनाथ शिंदे यांची तोंडभरुन कौतूक केले. ते म्हणाले की एकनाथ शिंदे यांना आपण ते बाळासाहेबचे शिवसैनिक असल्यापासून ओळखत आहे.आमची मैत्री जुनी आहे मी त्यांच्याकडे काही मागत नाही..अशी पुस्ती त्यांनी यावेळी जोडली.नाना पाटेकर पुढे म्हणाले की काही राजकीय मंडळी आहेत. त्यांच्यावर काही ठपका नाही.. त्यांच्या पैकी एक म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. यांच्यावर एक ही डाग पाहायला मिळाला नाही. देवेंद्र आणि अजित या दोघांना सुद्धा मी जवळून ओळखतो. त्यांचे सुद्धा काम चांगले आहे. मात्र एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुद्धा त्यांच्याकडे कोणी बोट दाखवू शकले नाही अशा शब्दात अभिनेते नाना पाटेकर यांनी शिंदे यांचे कौतूक केले आहे.

## विदर्भात पुन्हा अवकाळी अन् गारपीटचे संकट, राज्यातील तापमानाबाबत IMD चा काय अंदाज?

राज्यात वातावरणात सध्या विचित्र परिस्थिती निर्माण झाले आहे. एकीकडे राज्यांमधील काही शहरांचे तापमान 45 अंश सेल्सियसवर पोहचले आहे. दुसरीकडे अवकाळी पाऊस आणि गारपीटचे संकट आहे. विदर्भातील काही भागांत शनिवारी अवकाळी पाऊस अन् गारपीट झाली. आता पुन्हा विदर्भासह, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीटचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.मे महिन्यात तापमान वाढत असताना अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. शनिवारी काही ठिकाणी गारपीट देखील झाली. भारतीय हवामान खात्याकडून आताही विदर्भात पुन्हा पावसाचा इशारा दिला आहे. तसेच मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील काही भागांत रविवारी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. अरबी समुद्रात तामिळनाडूपर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यामुळे महाराष्ट्रातील वातावरणावर त्याचे परिणाम झाले आहे.महाराष्ट्रातील अनेक शहरांचे तापमान 40 अंश सेल्सियसच्या वर गेले आहे. अकोल्यात 44.9, चंद्रपूर 43.4, वाशिम 43, यवतमाळ शहराचे तापमान 43.4 अंश सेल्सियसवर गेले. मुंबईतील कुलाबात 34.2 अंश तापमानाची नोंद करण्यात आले.

## तर मला त्यांचा अभिमान, अमृता फडणवीस यांनी पीएम मोदी यांचे केले कौतूक

मला खूप आनंद आहे की आपण WAVES 2025 परिषदे सारखा उपक्रम राबवला आहे, आज त्याचा तिसरा दिवस आहे मला वाटते आपण जर वेगवेगळ्या देशांकडून शिकलो तर आपल्याला फायदा होईल. साऊथ कोरियाचे के पॉप हे म्युझिक इतकं प्रसिद्ध झालं की लोक त्यांची गाणी कळण्यासाठी त्यांची भाषा शिकू लागले आहेत असे अमृता फडणवीस यांनी बीकेसी येथील जिओ वर्ल्डमध्ये भरवलेल्या WAVES 2025 समिटला भेट दिल्यानंतर म्हटले आहे.त्यापुढे म्हणाल्या की संगित,कला, नाटक हा एक आर्ट फॉर्म आहे. ही भाषा थेट मनाला भिडते. WAVES ने महाराष्ट्रात नाही तर देशात खळबळ माजवली आहे. आणि मला वाटत ही एक सुरुवात आहे, पण यामुळे त्या-त्या देशांशी कल्चरल डिप्लोमसी आणि पॉलिटिकल कनेक्शन मजबूत होतील, आपल्या रिजनल क्लासिकल म्युझिकलाही एक प्लॅटफॉर्म मिळाला आहे,



ग्लोबली भारतीय संगिताचा प्रचार होईल असेही अमृता फडणवीस यावेळी म्हणाल्या.विरोधक टीका करीत आहेत की देशात युद्धजन्य परिस्थिती असतानाही पंतप्रधान या परिषदेला हजर राहीले या संदर्भात प्रश्न विचारले तर त्यांनी मी सांगेन की तुम्ही जमैकन इकॉनॉमी पाहा. कॅरेबियन मधला हा देश आहे. केवळ टुरिझममुळे तो अवलंबून आहे. साऊथ कोरियांचे के पॉप पहा त्यांच्या म्युझिकमुळे लोकांनी विश्वास दाखवला आहे त्यांची भाषा कळत नाही मात्र लोक ती भाषा शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. म्युझिकमुळे त्यांची भाषा शिकण्याची इच्छा झाली आता २ लाखापेक्षा जास्त लोक कोरियन भाषा शिकत आहेत असेही अमृता फडणवीस यांनी सांगितले.

# फुले चित्रपट टॅक्स फ्री करावा, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची मागणी

महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील 'फुले' सिनेमा सेंसॉरच्या कचाट्यातून सुटल्यानंतर रिलीज झाला आहे. हा एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारक सिनेमा आहे. देशभरात नव्या पिढीला महात्मा फुले यांच्या जीवनकार्याची माहिती मिळणे आवश्यक आहे.जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत त्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या क्रांतीचा इतिहास नव्या पिढीला समजला पाहिजे. त्यासाठी फुले चित्रपट हा देशभरात टॅक्स फ्री झाला पाहिजे अशी आपली मागणी असून त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले अंधेरी येथे रामदास आठवले यांच्या साठी फुले सिनेमाचे स्पेशल स्क्रिनिंग करण्यात आले. फुले चित्रपट पाहिल्यानंतर रामदास आठवले यांनी हा चित्रपट देशभरात पोहोचला पाहिजे. त्यासाठी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित व्हावा आणि फुले या चित्रपटाला करमुक्त करावे अशी आपली मागणी असून त्या बाबतचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देणार असल्याची माहिती रामदास आठवले यांनी दिली. यावेळी फुले चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत महादेवन आणि निर्माते रितेश कुडेचा रिपाइंचे शैलेशभाई शुक्ला, सिद्धार्थ कासारे, जतीन भुट्टा, प्रकाश जाधव आदी उपस्थित होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासाठी शो दाखवा

महात्मा फुले यांच्या जीवनावरील फुले





हा सिनेमा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपती भवनात दाखवण्यात यावा अशी विनंती दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी रामदास आठवले यांना केली. त्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन रामदास आठवले यांनी दिले. फुले सिनेमा सर्व सिनेमागृहात दाखवण्यात यावा. सर्वांनी फुले सिनेमा जरूर पाहावा असे आवाहनही रामदास आठवले यांनी यावेळी केले. फुले चित्रपटात प्रतीक गांधी आणि पत्रलेखा यांनी मुख्य भूमिका केलेली आहे. फुले सिनेमामध्ये महात्मा फुले यांचे जीवनकार्य त्यांचे क्रांतिकारी योगदान अत्यंत उत्कृष्टपणे दाखवण्यात आले आहे असे कौतुक रामदास आठवले यांनी केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com